महाराष्ट्र शासन
वैद्यकिय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, छिंदवाडा रोड, नागपूर.४४००३०

: +91 9423312570, +91 9423313974
Website : http://arogya.maharashtra.gov.in
: msrmhn@rediffmail.com &
nagpurmentalhospital3@gmail.com

4486
जा.क्र/Quotation Notice/ /२०२६
कार्यालय :- वैद्यकिय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय,नागपूर
दिनांक :- 27 OCT 2026

दरपत्रक आमंत्रण सूचना

विषय : नवीन राज्यस्तरीय स्वच्छता कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यंत प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे रोजंदारी तत्त्वावर स्वच्छता सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाची दिनांक २९/०९/२०२६ रोजीची टिपणी.

प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नवीन राज्यस्तरीय स्वच्छता कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यंत रोजंदारी तत्त्वावर स्वच्छता सेवा उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

सदर कामासाठी यापूर्वी राबविण्यात आलेली दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्यात आली असून, नव्याने दरपत्रक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार इच्छुक व पात्र संस्था/कंत्राटदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रक आमंत्रण सूचना महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

१. रुग्णालयाच्या क्षेत्रफळाची माहिती

अ.क्र.	तपशील	क्षेत्रफळ/संख्या
१	रुग्णालयाचे नाव	प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर
२	एकूण क्षेत्रफळ (अंदाजे)	५,८९,२२१.४८ चौ. फूट
३	बांधकामाचे प्रत्यक्ष कार्पेट क्षेत्रफळ	१,५८,८३१.४८ चौ. फूट
४	इमारती/वॉर्ड इत्यादींची संख्या (अंदाजे)	४८
५	खोल्यांची संख्या (अंदाजे)	७५
६	शौचालये व स्नानगृहांची संख्या(अंदाजे)	२७०
७	अंतर्गत रस्त्याचे क्षेत्रफळ	४३,०४० चौ. फूट

२ . दरपत्रक सादर करण्याची पद्धत

इच्छुक संस्था/कंत्राटदारांनी दरपत्रक व त्यासंबंधीची कागदपत्रे दोन स्वतंत्र बंद लिफाफ्यांमध्ये सादर करावीत. दोन्ही लिफाफे एका मोठ्या बंद लिफाफ्यात ठेवून त्यावर संस्थेचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक नमूद करावा.

लिफाफा क्र. १ – तांत्रिक कागदपत्रे (TECHNICAL)

या लिफाफ्यात खालील कागदपत्रे जोडावीत:
१. परिशिष्ट-१ नुसार पूर्ण भरलेला व स्वाक्षरी केलेला निविदा/दरपत्रक अर्ज नमुना (Tender Form).

२. संस्थेचे/कंत्राटदाराचे वैध नोंदणी प्रमाणपत्र.
३. लागू असल्यास स्वच्छता सेवा किंवा कंत्राटी कामगार पुरविण्याचा वैध परवाना.
४. PAN कार्डाची स्वसाक्षांकित प्रत.
५. GST नोंदणी प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत (लागू असल्यास).
६. EPF व ESIC नोंदणीचे पुरावे
७. परिशिष्ट ३ नुसार भरलेला कंत्राटदाराच्या सर्वसाधारण तपशीलांचा नमुना (Contractor Details Form / General Details of Bidder).
८. खरेदी प्रक्रियेशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांशी कोणतेही नातेसंबंध किंवा हितसंबंध नसल्याबाबतचे स्वाक्षरीत प्रतिज्ञापत्र.
९. आर्थिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या मागील तीन आर्थिक वर्षांचे आयकर विवरणपत्र (Income Tax Return ITR) दाखल केल्याचे पुरावे.
१०. परिशिष्ट-४ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी.
लिफाफ्यावर ठळक अक्षरांत "लिफाफा क्र. १ – तांत्रिक कागदपत्रे (TECHNICAL)" असे नमूद करावे.

लिफाफा क्र. २ – दरपत्रक (QUOTATION / RATE)
या लिफाफ्यात परिशिष्ट-२ नुसार पूर्ण भरलेले दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर अधिकृत स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.
लिफाफ्यावर ठळक अक्षरांत "लिफाफा क्र. २ – दरपत्रक (QUOTATION / RATE)" असे नमूद करावे.
महत्त्वाची सूचना : लिफाफा क्र. १ मधील आवश्यक कागदपत्रांची छाननी करण्यात येईल. तांत्रिक कागदपत्रे अपूर्ण असल्यास किंवा आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास संबंधित संस्था/कंत्राटदाराचे दरपत्रक तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरविण्यात येईल व लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. केवळ तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या संस्था/कंत्राटदारांचेच दरपत्रक असलेले लिफाफे उघडण्यात येतील.

३. दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत
दरपत्रकाचे दोन्ही लिफाफे एका मोठ्या बंद लिफाफ्यात ठेवून दिनांक ०६/११/२०२६ (शुक्रवार) रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत खालील कार्यालयात सादर करावेत.
दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण :कार्यालय,वैद्यकीय अधीक्षक,प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर.
विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.

४. या पत्रासोबत जोडलेली परिशिष्टे
१. परिशिष्ट-१ : निविदा/दरपत्रक अर्ज नमुना (Quotation Form).
२. परिशिष्ट-२ : दरपत्रक नमुना (दरपत्रक सादर करण्याचा विहित नमुना).
३. परिशिष्ट-३ : कंत्राटदाराच्या सर्वसाधारण तपशीलांचा नमुना (Contractor Details Form / General Details of Bidder).
४. परिशिष्ट-४ : दरपत्रकाशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे, अटी व शर्ती.

वैद्यकीय अधीक्षक
प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर

ANNEXURE-1

Tender Form

To
The Medical Suprintendent
Regional mental Hospital Nagpur

Dear Sir

Having examined the tender document, the receipt of which is hereby acknowledged, we, the undersigned, offer for Cleaning Services under the above-named Contract in full conformity with the said tender document and our financial offer in the Price schedule submitted in Envelop No.2 which is made part of this tender.

We undertake, if our tender is accepted, to deliver the goods in accordance with the delivery schedule specified in the tender document.

If our tender is accepted, we undertake to submit the security deposit in the form, in the amounts, and within the times specified in the tender document.

We agree to abide by this tender, for the Tender Validity Period specified in the tender document and it shall remain binding upon us
and may be accepted by you at any time before the expiration of that period.

Until the formal final Contract is prepared and executed between us, this tender together with your written acceptance of the tender and your Acceptance of Tender shall constitute a binding Contract between us. We understand that you are not bound to accept the lowest or any tender you may receive.

Signed:

Date:

In the capacity of:

Duly authorized to sign this bid for and on behalf of:

Signature & stamp of tenderer

Note: This form must be signed & Stamped in original to be submitted to this office along with Tender.

ANNEXURE-२

PRICE SCHEDULE - दरपत्रकाचा नमुना

Sr. No.	कंत्राटदाराच्या फर्मचे नाव	प्रति स्वच्छता कामगार मासिक दर (रु.)
१		

Notes / महत्त्वाच्या सूचना

१. L-१ (Lowest Price): सर्वात कमी दर (L-१) निश्चित करताना दरपत्रकात नमूद केलेला दर विचारात घेतला जाईल.

२. Payment: निविदा दस्तऐवजातील अटी व शर्तींनुसार देयक अदा करण्यात येईल.

३. Service Period: लागू कामगार कायद्यांनुसार साप्ताहिक सुट्ट्यांसह संपूर्ण महिनाभर स्वच्छता सेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

४. Taxes: नमूद दरामध्ये लागू TDS, GST व इतर सर्व लागू कर व शुल्कांचा समावेश असावा.

५. Total Cleaning Area: नमूद दरामध्ये रुग्णालयाच्या संपूर्ण स्वच्छता क्षेत्राचा समावेश असावा. यामध्ये सर्व इमारतींचे बांधकाम क्षेत्र (Built-up Area), अंतर्गत जागा व खुला परिसर (Open Area/Premises) यांचा समावेश राहील.

६. Manpower: दररोज किमान ३० स्वच्छता कर्मचारी तीन पाळ्यांमध्ये उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. प्रति स्वच्छता कर्मचारी मासिक दरामध्ये मूळ वेतन, विशेष भत्ता/महागाई भत्ता (DA) व लागू वैधानिक लाभांसह कर्मचाऱ्यांवरील सर्व खर्च समाविष्ट असावा.

७. Cleaning Materials and Equipment: कंत्राटदारामार्फत उपलब्ध करून द्यावयाचे सर्व साहित्य व साधने, उदा. झाडू, ब्रश, कचरापेट्या, कचऱ्याच्या पिशव्या, फिनाईल, डिटर्जंट, जंतुनाशक द्रव्य, सोडियम हायपोक्लोराइट, मॉप, स्वच्छतेचे कापड, बादल्या, गवत कापण्याचे यंत्र, गणवेश, ओळखपत्र, सुरक्षा साधने व इतर आवश्यक साहित्य यांचा खर्च नमूद दरामध्ये समाविष्ट असावा. यासाठी स्वतंत्र अतिरिक्त देयक दिले जाणार नाही.

कंत्राटदाराचे नाव: _____

स्वाक्षरी व शिक्का: _____

दिनांक: _____

Annexure-03

CONTACTDETAILS FOR M

GENERAL DETAILS OF BIDDER

1.NAME OF THE COMPANY:-

2. NAME AND DESIGNATION OF AUTHORISED REPRESENTATIVE:-

3.COMMUNICATION ADDRESS:-

4.PHONE NO/MOBILE NO:-

5.E-MAILI.D:-

PARTICULAR DETAILS OF THE BIDDER'S REPRESENTATIVE

1.NAME OF THECONTACT PERSON:-

2.DESIGNATION:-

3.PHONE NO:-

4.MOBILENO:-

5.E-MAILLD:-

UNDERTAKING

1. 1, the undersigned certify that I have gone through the terms and conditions mentioned in the bidding document and undertake to comply with them.
2. The rates quoted by me are valid and binding upon me for the entire period of contract.
3. I hereby undertake to provide the services as per the directions given in the tender document/contract agreement.

Signature of the Authorized Signatory

Date:-

Place:-

Designation: (Office seal of the Bidder)

ANNEXURE-४ (परिशिष्ट ४)

स्वच्छता कामाच्या दरपत्रकासोबतच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती

अ) कामाचे स्वरूप व अटी व शर्ती

अ.क्र.	अटी व शर्ती
१	सदर स्वच्छता काम तात्पुरत्या स्वरूपाचे असून, शासनस्तरावरील नवीन स्वच्छता कंत्राटदाराची नियुक्ती/निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहील. त्यानंतर सेवा समाप्त करण्याचा अधिकार रुग्णालय प्रशासनास राहील व त्याबाबत कंत्राटदारास कोणताही स्वतंत्र दावा करता येणार नाही.
२	सदर कामाचे कार्यक्षेत्र केवळ प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील स्वच्छता कामापुरते मर्यादित राहील.
३	प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर हे ९४० खाटांचे व २४ तास सुरू असलेले रुग्णालय असल्याने कंत्राटदाराने दररोज किमान ३० स्वच्छता कर्मचारी तीन पाळ्यांमध्ये उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांची संख्या कमी-जास्त करण्याचे अधिकार वैद्यकीय अधीक्षक यांना राहतील.
४	रुग्णालयातील इमारती, कार्यालये, OPD, IPD, वॉर्ड, खोल्या, कॉरिडॉर, प्रतीक्षागृह, जिने, स्वच्छतागृहे, स्नानगृहे, स्वयंपाकघर, सभागृह, अंतर्गत रस्ते व संपूर्ण परिसराची स्वच्छता तसेच प्रशासनाने निर्देशित केलेली संबंधित स्वच्छतेची कामे करणे बंधनकारक राहील.
५	काम Output Basis तत्त्वावर राहील. दर सादर करताना एकूण क्षेत्रफळ, कामाचे प्रमाण, आवश्यक मनुष्यबळ, स्वच्छता साहित्य, उपकरणे व इतर अनुषंगिक खर्च विचारात घ्यावा.
६	रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार २४ तास स्वच्छता सेवा उपलब्ध राहील अशा प्रकारे पाळीनुसार आवश्यक मनुष्यबळाची व्यवस्था कंत्राटदाराने करावी.
७	कर्मचाऱ्यांना शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या लागू किमान वेतनानुसार मूळ वेतन, विशेष भत्ता/महागाई भत्ता (DA) व इतर वैधानिक लाभ देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
८	किमान वेतन, विशेष भत्ता/DA किंवा इतर वैधानिक देयकांमध्ये शासनाकडून बदल झाल्यास, लागू कायदे व करारातील तरतुदीनुसार सुधारित दराने देयके अदा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
९	महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २२/०२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार तसेच लागू कामगार कायदे व नियमांनुसार बोनस, EPF, ESIC/लागू विमा व इतर वैधानिक लाभांची पूर्तता कंत्राटदाराने करावी.
१०	कर्मचाऱ्यांना लागू कायद्यानुसार साप्ताहिक सशुल्क सुट्टी द्यावी. सुट्टीच्या दिवशी सेवा आवश्यक असल्यास पर्यायी कर्मचारी किंवा नियमानुसार देय भरपाई/सुट्टीची व्यवस्था कंत्राटदाराने करावी.
११	कर्मचाऱ्यांची उपस्थिती, केलेले काम व आवश्यक अभिलेख कंत्राटदाराने नियमित ठेवावेत. देयकाची पडताळणी प्रत्यक्ष काम, उपस्थिती व करारातील अटींनुसार करण्यात येईल.
१२	कर्मचाऱ्यांना गणवेश, ओळखपत्र व आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
१३	स्वच्छतेचा दर्जा समाधानकारक नसल्यास रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या सुधारणा/सूचनांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
१४	प्रत्येक निविदाकार/कंत्राटदारास एकच दरपत्रक सादर करता येईल. एकापेक्षा अधिक दरपत्रके सादर केल्यास संबंधित दरपत्रक अपात्र ठरविण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

अ.क्र.	अटी व शर्ती
१५	सदर कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याशी कोणतेही नाते, हितसंबंध किंवा आर्थिक हितसंबंध नसल्याचे स्वाक्षरीयुक्त प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.
१६	दरपत्रक सादर केल्याने काम मिळण्याचा कोणताही हक्क निर्माण होणार नाही. दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

ब) रुग्णालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येणारी सुविधा

अ.क्र.	सुविधा
१	उपलब्धतेनुसार स्वच्छता साहित्य व उपकरणे ठेवण्यासाठी एक स्वतंत्र खोली रुग्णालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

ब) कंत्राटदारांकडून स्वच्छता कामगारांना पुरविण्यात येणाऱ्या वस्तू, साहित्य व साधने

अ.क्र.	साहित्य / साधने
१	झाडू, ब्रश, कचरापेट्या व कचऱ्याच्या पिशव्या.
२	फिनाईल, डिटर्जंट, जंतुनाशक द्रव्य, सोडियम हायपोक्लोराइट, क्लिनिंग पावडर व स्वच्छतागृह स्वच्छतेचे साहित्य.
३	मॉप, स्वच्छतेचे कापड, बादल्या, मग व इतर आवश्यक स्वच्छता उपकरणे.
४	परिसर स्वच्छतेसाठी गवत कापण्याचे यंत्र, खुरपे, फावडे, रेक व इतर आवश्यक साधने.
५	कर्मचाऱ्यांसाठी गणवेश, ओळखपत्र, हातमोजे, मास्क, गमबूट व इतर आवश्यक सुरक्षा साधने.
६	प्लास्टिक पाइप, पाणी वाहून नेण्यासाठी आवश्यक साहित्य व इतर पूरक वस्तू.
७	फिनाईल व इतर स्वच्छता साहित्य उत्तम दर्जाचे व लागू मानकांनुसार/आवश्यकतेनुसार ISI प्रमाणित असावे. फिनाईल, डिटर्जंट, जंतुनाशक द्रव्य, फिनाईल ॲसिड, सोडियम हायपोक्लोराइट इ. साहित्य प्रयोगशाळेकडून प्रमाणित असावे व त्याची प्रमाणपत्रे आवश्यकतेनुसार सादर करावीत.
८	वरील सर्व साहित्य, उपकरणे व साधने उपलब्ध करून देणे तसेच ती चांगल्या व वापरण्यायोग्य स्थितीत ठेवणे ही कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

कंत्राटदाराचे स्वीकृतीपत्र

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य असून त्यांचे पालन करण्याची हमी देत आहे/आहोत.

तपशील	माहिती
कंत्राटदाराचे नाव	_____
स्वाक्षरी	_____
दिनांक	_____
शिक्का	_____